# “सोनेरी स्वप्न”




(चित्र – स्वरूपा गाडगीळ)

खरंतर आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यात अनेक सुखाचे क्षण येतात. काही कठीण, खडतर प्रसंगांनंतर आलेलं सुख म्हणजे तर सुवर्णकाळच भासतो. पण तरीही, आवर्जून आठवणीत राहतील असे किंवा ज्यांनी तुमच्या आयुष्यालाच कलाटणी मिळाली असे काही क्षण, प्रसंग कायम तुमच्या मनात घर करून राहतात. माझ्या आयुष्यात आलेल्या अशाच एका सुवर्णसंधीची ही छोटीशी कहाणी!

“Congratulations Ishwari! Anandam is very impressed with you and has asked you to join, if possible, from today!” माझ्या जाडजूड पोर्टफोलिओ मधील एकही सर्टिफिकेट न बघता, प्रिंसिपॉल सरांच्या तोंडून आलेले हे उद्‌गार ऐकून, मला आभाळ ठेंगणं झालं! तासाभरापूर्वीच इंटरव्यूला आलेली मी, वयाच्या विसाव्या वर्षी पंचवीस हजाराची नोकरी खिशात टाकून, त्या इमारतीबाहेर पडले सुद्धा!!

साधारण दोन–एक आठवड्यापूर्वी माझ्या “Alliance Française” नावाच्या फ्रेंच भाषेच्या इन्स्टिटट्यूट मध्ये दारावर "फ्रेंच टीचर"च्या पोस्ट साठी एक जाहिरात लागली होती. सहजपणे अजिबात लक्षात येणार नाही इतक्या त्या छोट्या चिटोरीतल्या मजकुराने माझं लक्ष वेधलं आणि मी तो फोन नंबर लिहून घेतला.

या दरम्यान माझी आजी, वय जास्त असल्यानं हॉस्पिटल मध्ये अॅडमिट होती. घरातील आम्ही सगळ्यांनी आळीपाळीने दवाखान्याची ड्युटी वाटून घेतली होती. तिला आता लवकरच डिस्चार्ज मिळेल इतपत तिची प्रगती झाल्यावर मला अचानक या चिटोरीतल्या नंबरची आठवण झाली. तसा खरं तर उशिरच झाला होता पण मी तरीही फोन लावला. ही पोस्ट अजून रिकामीच आहे हे कळल्यावर मी लगेचच इंटरव्यूची तारीख पक्की केली. दोन दिवसांनी दवाखान्यातून परस्पर इंटरव्यूला पोहोचले आणि नोकरी मिळाली.

अक्षरशः स्वप्नात असल्यासारख्या या साऱ्या घटना वेगानी घडल्या. त्या दिवशी घरी आल्या आल्या आईबाबांना ही बातमी सांगितली. त्यांचा तर विश्वासच बसेना आणि त्यांना खूप आनंद झाला. परदेशी विद्यार्थ्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यातील एका प्रथितयश शिक्षण संस्थेमध्ये मला वयाच्या विसाव्या वर्षी नोकरी मिळेल, तीही पाच आकडी पगाराची असा विचार आई–बाबांनीच काय मीही कधी केला नव्हता. पण मिळालेल्या संधीला मी होकार दिला आणि माझ्या परकीय भाषेतील करियरच्या एका महत्वाच्या टप्प्याची सुरुवात झाली..! शाळेत असल्यापासूनच माझा ओढा भाषेकडे जास्त होता. बाकी विषयांची तशी बोंब नव्हती, पण कायम "हुशार मुलांच्या" तुकडीत असलेल्या मला गणित–विज्ञानाने कधी फारशी साथ दिली नाही. यामुळे उगाचच का होईना, माझ्या भवितव्याबद्दल मला कायमच थोडी हुरहूर वाटायची. शाळेतल्या सततच्या जीवघेण्या स्पर्धा आणि चढाओढीच्या वातावरणात माझा आत्मविश्वास कमी पडत होता.

पण दहावीनंतर मात्र या वातावरणाला तडा गेला. त्यावेळी परकीय भाषांचे वारे वाहत होते. पण “दुभाष्या” खेरिज नोकरीच्या फारशा संधी अजून उपलब्ध नव्हत्या. डॉक्टर्स, इंजिनियर्स, सीए, सीएस, या सगळ्या पदव्यांपुढे माझ्या आवडीनुसार मी “परकीय भाषेतलं करिअर” निवडलं आणि त्यानुसार कॉमर्सला प्रवेश घेतला. पुण्यात “Alliance Française” ही फ्रेंच भाषा शिकवणारी प्रसिद्ध संस्था आहे. त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या परकीय भाषा विभागातही फ्रेंचचे वर्ग चालतात. या दोन्ही ठिकाणचे क्लासेस आणि कॉमर्स अशी माझी तिहेरी कसरत चालू झाली. शाळेत असताना खाजगी क्लासमध्ये काणेगावकर काकांनी पढवून घेतलेलं इंग्रजीचं व्याकरण आणि दहावीनंतर सुट्टीत केलेला स्पोकन इंग्लिशचा कोर्स या दोन्ही गोष्टींचा फ्रेंच शिकताना खूपच उपयोग झाला.

पु.लं.च्या भाषेत सांगायचं, तर वाईनच्या पेल्यात लयीत फिरणाऱ्या या मधाळ फ्रेंच भाषेशी माझी चांगली गट्टी जमली. अख्खा फ्रान्स पाब्लो पिकासोच्या कुंचल्यातून जिवंत होऊन डोळ्यासमोर उभा

राहील अशी उत्तम भाषा शिकवणारे शिक्षक लाभले. कालांतरानी लक्षात आले, की शाळेतल्या अटीतटीच्या स्पर्धेतून बाहेर पडल्यामुळे माझा आत्मविश्वास नक्कीच वाढला होता आणि भाषेमध्ये मी बऱ्यापैकी यशस्वी घोडदौड करत होते.

कॉमर्सचे ग्रॅज्युएशन होईपर्यंत मी फ्रेंचच्या जवळपास सगळ्या परीक्षा पूर्ण केल्या होत्या आणि नेटिव्ह फ्रेंच भाषिकासारखं फ्रेंच मी बोलायला लागले होते. फ्रान्सला जाऊन पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी स्कॉलरशिप मिळवण्याच्या माझ्या खटपटी चालू होत्या आणि त्यातच या नोकरीची संधी चालून आली. शिक्षण क्षेत्रात मला पहिल्यापासूनच खूप रस होता. घरी दोन्ही बाजूचे आज्जी—आजोबा, काकू, आत्या सगळेच हाडाचे शिक्षक! कदाचित त्यांच्याकडूनच मला ही शिकवण्याची आवड आली असावी.

नोकरी चालू केली तेव्हा या संस्थेच्या जवळपास तीस—एक संस्थांमधील शिक्षकांमध्ये मी वयानी सर्वात लहान होते. "इंटरनॅशनल स्कूल" हा प्रकार साधारण १२—१५ वर्षांपूर्वी खूपच नवीन होता. "IB world school" किंवा "International Baccalaureate" हे शब्द सगळ्यांसाठीच खूप नवखे होते. केम्ब्रिज आणि जिनिव्हा विद्यापीठाशी हे अभ्यासक्रम संलग्न होते. यात प्रत्येक विषयाची सखोलपणे आणि कठिणपातळी राखून परीक्षा घेतली जाते त्यामुळे शिक्षकांवर मोठीच जबाबदारी असते. माझ्या बाबतीत, मुळात भाषेचे ज्ञान पक्के असल्याने हा नवीन अभ्यासक्रम पटकन आत्मसात करायला काही अडचण आली नाही.

एकाच वर्गात माझ्याकडे तेव्हा वेगवेगळ्या देशातील विद्यार्थी होते. आमच्या संपूर्ण शाळेमध्येच त्यावेळी जवळपास विविध १५ देशातील विद्यार्थी शिक्षण घेत होते. हा अनुभव सुरुवातीला माझ्यासाठी अगदी विलक्षण होता. वेगवेगळी मातृभाषा असणाऱ्या या मुलांना इंग्रजीच्या समान धाग्यानी बांधून फ्रेंच भाषेमध्ये पारंगत करणे हे कौशल्याचे काम होते. त्यातून माझे वय अगदीच लहान असल्यामुळे, १०वी—१२वीच्या या मुलांना मला "टीचर" म्हणून मान्य करायला थोडा वेळ लागायचा. उंचपुऱ्या मुलांसोबत मी उभी राहिले की टीचर कोण आणि मुले कोण असा सावळा गोंधळ. पण काही महिन्यांमध्ये मला त्यांना आपलेसे करण्याचे तंत्र जमले. ही टीचर चांगली शिकवते आणि हीचं ऐकलं की आपल्याला चांगले मार्क मिळतात हे त्यांच्या लक्षात आल्यावर मात्र सगळी गणितं बदलली. मी त्यांची मैत्रीण असल्यासारखी ही मुलं माझं म्हणणं मनापासून ऐकू लागली.

'पुरिया' नावाचा माझा इराण मधून आलेला विद्यार्थी. सगळ्या विषयात फक्त फ्रेंच मध्ये तो मागे होता. एक दिवस मला हात जोडून त्यानी विनंती केली "तू काहीही कर, पण मला फ्रेंच मध्ये अ ग्रेड मिळाली पाहिजे. तरच माझी ओव्हरऑल ग्रेड चांगली येईल. नाहीतर माझे वडील मला इराणला परत घेऊन जातील आणि मग मला सैन्यात भरती व्हावं लागेल." तेव्हापासून शक्य असेल तेव्हा आमच्या कॉमन मोकळ्या वेळात मी त्याचे जादाचे क्लास घेणं चालू केलं. आणि हळूहळू गरज असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मी जादाचे क्लास घेणं हा एक शिरस्ताच झाला. केम्ब्रिजच्या फायनल परीक्षेत अ+ ग्रेड

मिळाल्यावर पुरिया माझ्याजवळ येऊन अक्षरशः रडायला लागला. शाळेच्या वेळापत्रकाबाहेर मी घेत असलेल्या या मेहेनतीची वरिष्ठांनी विशेष दखल घेतली. आणि दिवसागणिक फ्रेंच विषय घेतलेला प्रत्येक विद्यार्थी फक्त अ किंवा अ+ ह्या श्रेणी मध्ये उत्तीर्ण होऊ लागला.

"तू कधीच का गं आजारी पडत नाहीस? आम्हाला एकही फ्रेंच क्लासला सुट्टी मिळत नाही" असा तक्रारीचा सूर लावणारी कॅनडा मधील स्नेहा मला शेवटच्या दिवशी येऊन हातात एक सुंदर ग्रिटींग कार्ड देऊन गेली. आतील मजकूर होता , "Thank you Ms. Ishwari for pulling me from C to A + grade!"

ओबामा दुसऱ्यांदा निवडून आला म्हणून ही बातमी मला द्यायला आनंदाने धावत क्लास मध्ये येणारा अलास्काचा रोरी इथपासून ते "तुझ्या हातावरची मेंदी किती छान दिसतीये" हे सांगणारी शुभांगी! या आणि अशा कितीतरी हृद् प्रसंगांनी हे दिवस खरोखर मंतरले होते.

केवळ अभ्यासक्रमाशी सीमित न राहता, मी फ्रेंच भाषेशी निगडित अनेक निरनिराळे उपक्रम शाळेत चालू केले. माझ्या परिचयाच्या काही फ्रेंच पाहुण्यांना मी मुलांशी बोलायला शाळेत आमंत्रित करत असे. भारतातील फ्रेंच एम्बसी तर्फे घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांना मी आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना पाठवू लागले. फ्रेंच भाषा आणि संस्कृती या विषयाला धरून अनेक सांस्कृतिक कार्यक्रम शाळेत राबवले.

आमच्या शाळेची पहिली–वहिली आंतरराष्ट्रीय सहल मी मुलांसाठी घडवून आणली. १५ दिवस १५ जणांचा कंपू पॅरिस आणि फ्रान्स मधील काही मोठ्या शहरांमध्ये धमाल करून परत आला. दोन आठवडे त्यांच्या फ्रेंच मित्र–मैत्रिणींच्या घरी राहून आलेले माझे विद्यार्थी बऱ्यापैकी चांगल्या फ्रेंच मध्ये संभाषण करू लागले आणि १०० मार्कांच्या फ्रेंचच्या तोंडी परीक्षेसाठी त्यांचा आत्मविश्वास कमालीचा वाढला!

या मधल्या काळामध्ये मी "फ्रेंच टीचर" वरून "फ्रेंच भाषा विभाग प्रमुख" झाले आणि जिनिव्हा विद्यापीठाची मान्यताप्राप्त "फ्रेंच भाषा परीक्षक" पण झाले. जसे साततत्याने "बेस्ट परफॉर्मन्स अवॉर्ड्स" मिळत गेले, तसे लहान वयात पेललेल्या मोठ्या जबाबदारीने अनेक पेचाचे प्रसंग देखील आले, पण घरातील सगळ्यांनी आणि नोकरीत वरिष्ठांनी दाखविलेल्या विश्वासामुळे आणि पाठिंब्यामुळे मी हा पल्ला लीलया पार करू शकले. या मधल्या काळामध्ये माझ्यासोबत काम करणाऱ्या कितीतरी अनुभवी आणि हरहुन्नरी शिक्षकांकडून अनेक गोष्टी शिकता आल्या आणि घरोब्याचे संबंध निर्माण झाले.

एकीकडे नोकरीत आपण स्थिरावतोय, हा आनंद होताच, पण अजून पदव्युत्तर शिक्षण न घेतल्याची खदखद मनात कुठेतरी होती. मग हातातील नोकरी जाऊ न देता आवडत्या क्षेत्रात पुढील शिक्षण घेण्याचे पर्याय मी शोधले. मॅनेजमेंट आणि इकॉनॉमिक्स हे माझे खूप आवडीचे विषय. दिवसभराची नोकरी सांभाळून मी “MBA” पूर्ण केलं. त्याचबरोबर पुढे फ्रान्सला जाऊन खास फ्रेंच भाषेच्या शिक्षकांसाठी असणाऱ्या एका प्रसिद्ध कॉलेजमधून काही महत्वाचे कोर्सेस मी पूर्ण केले. वेळोवेळी माझ्या परिक्षांदरम्यान शाळेकडून मिळालेल्या सहकार्यामुळेच हे पुढचे शिक्षण शक्य झाले.

लग्न करून जेव्हा अमेरिकेत स्थायिक होण्याची वेळ आली तेव्हा मात्र खरंच कसोटीचा क्षण आला. माझ्या आयुष्याचा एक महत्वाचा भाग बनलेल्या या नोकरीला मी रामराम ठोकला. “The best way to appreciate your job is to imagine yourself without one!” काहीतरी कमावण्यासाठी काहीतरी गमवावं लागतं, हे मी पुरेपूर अनुभवलं!

आज मी अमेरिकेत सुद्धा नोकरी करते आहे पण आयुष्यात केलेल्या पहिल्या नोकरीचा अनुभव काही औरच! खूप लहान वयात बाहेरच्या जगाचा, माणूस म्हणून समृद्ध करणारा अनुभव या नोकरीनी मला दिला. स्वतःच्या कमाईतून उच्चशिक्षणासाठी परदेशात जाण्याची संधी या नोकरीनी मला दिली. आत्मविश्वास, आर्थिक स्वावलंबन आणि ज्ञानदानाचं अपूर्व समाधान...या साऱ्याच गोष्टी या नोकरीमुळे अनुभवता आल्या. आजघडीला, चांगली नोकरी मिळवणं आणि ती टिकवणं या दोन्हीही गोष्टी दुरापास्त झाल्यात. तुम्हाला हव्या असणाऱ्या क्षेत्रात, हव्या त्या ठिकाणी, हव्या त्या पगाराची नोकरी मिळायला फारच भाग्य लागतं! या पार्श्वभूमीवर, अनेक नवीन वाटा खुणावत असताना, मिळालेल्या संधीला मी होकार दिला याचं फार समाधान वाटतं. माझ्या आयुष्यात आलेल्या या “सोनेरी स्वप्नासाठी” देवाचे खूप खूप आभार!

**ईश्वरी पर्वते–जोशी, न्यू जर्सी**